क्रमांक जिकागो/नपाप्र/ कावि/ 622 / 2017
जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया
दिनांक 07 / 09/2017

# जाहिर सूचना

नवनिर्मित आमगांव नगर परिषद हदीत समाविष्ठ 1) आमगांव 2) बनगांव 3) रिसामा 4) कुंभारटोली 5) पदमपूर 6) किंडगीपार 7) बिरसी 8) माल्ही या गावातील नागरीकांना सुचित करण्यांत येते की, ज्याअर्थी शासन अधिसुचना दिनांक 02/08/2017 अन्वये नवनिर्मित आमगांव नगर परिषद गठीत झाली आहे व त्याअनुषंगाने मा. राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र मुंबई यांचे पत्र दिनांक 11/08/2017 अन्वये आमगांव नगर परिषदेची प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम 2017 घोषित केला असुन नगर परिषद, आमगांव प्रभागातील जागाचे अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींमधील महिला, नागररिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील महिला तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिला यांचे आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम दिनांक 06/09/2017 रोजी दुपारी 12.00 वाजता नगर परिषद सभागृह, आमगांव येथे पार पाडण्यात आले आहे.

मा. राज्य निवडणुक आयोगाचे प्रभाग रचना, आरक्षण व सोडत कार्यक्रम 2017 नुसार नगर परिषद, आमगांव येथील प्रारुप प्रभाग रचना, पारदर्शक नकाशे व सदस्य संख्याचे आरक्षणाचे तपशिल याबाबत हरकती व सुचना मागविण्यासाठी नगर परिषद, आमगांव येथे व जिल्हाधिकारी कार्यालयाचे संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**त्याअनुषंगाने, नगर परिषद, आमगांव येथील नागरीकांना सुचीत करण्यात येते की, त्यांना यासंबंधी हरकती व सुचना दाखल करावयाचे असल्यास, दिनांक** 08/09/2017 **ते** 16/09/2017 **रोजी सांय.** 5.30 **वाजे पर्यंत नगर परिषद, आमगांव येथे दाखल करावे. तदनंतर प्राप्त होणारे हरकती व सुचनांचा विचार केला जाणार नाही. यांची नोंद सर्व नागरीकांनी घ्यावी. हि विनंती.**

ठिकाण- गोंदिया
दिनांक- 08/09/2017

**जिल्हाधिकारी गोंदिया, करीता**